एमआयडीसीतील दोन भूखंड औद्योगिक वापरासाठी रूपांतरित

उद्योग विभागाच्या प्रधान सचिवासह प्रमुख अधिकाऱ्यांना नोटीस

लोकसत्ता प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर : चिकलठाणा औद्योगिक वसाहतीतील दोन खुले भूखंड औद्योगिक वापरासाठी रूपांतरित केल्याप्रकरणी औरंगाबाद खंडपीठात दाखल याचिकेवरील सुनावणीवेळी न्या. मंगेश पाटील आणि न्या. प्रफुल्ल खुबाळकर यांनी राज्य शासन, उद्योग विभागाचे प्रधान सचिव, एमआयडीसीचे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि विभागीय व्यवस्थापक सतीश अग्रवाल आणि बिपीन दरापे यांना नोटीस बजावण्याचा आदेश दिला. या याचिकेवर चार आठवड्यांनंतर पुढील सुनावणी होणार आहे.

सामाजिक कार्यकर्ता चंद्रकांत चौंडीये यांनी याचिकेत म्हटल्यानुसार, चिकलठाणा एमआयडीसीमध्ये १२, १९ आणि २२ क्रमांकांचे खुले भूखंड आहेत. त्यावरील क्रमांक एफ-४० चा १३१५ चौ. मीटरचा आणि ई-५४ क्रमांकाचा ८००० चौ. मीटरचा भूखंड खुले भूखंड म्हणून दाखवलेले आहेत. त्या भूखंडांवर एमआयडीसीने कोट्यवधी रुपये खर्च करून २०१६-१७ ला ५ हजार झाडे लावली होती. जी आज सुमारे १५ ते २० फूट उंचीची झाली आहेत, असे ॲड. सिद्धेश्वर ठोंबरे यांनी युक्तिवादात सांगितले.

कुठलीही निविदा न मागविता वरील दोघा उद्योजकांच्या अर्जानुसार त्यांना अनुक्रमे प्रस्तावित एलएलपी कंपनी आणि शिवान्तिका ॲग्रो प्रा. लि. या उद्योगांसाठी ते भूखंड अनुक्रमे २ कोटी ५० लाख ४० हजार ४०० आणि ४ कोटी ३५ लाख ५ हजार ५०० रुपयांना वरील दोघांना दिले, असे याचिकाकर्त्याचे म्हणणे आहे. ५ हजार झाडे असलेला भूखंड उद्योगासाठी दिल्यामुळे पर्यावरणाची हानी होईल, असे याचिकाकर्त्याचे म्हणणे आहे.

नांदेडमध्ये महसूल आयुक्तालय स्थापणार

महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचे अनुकूल वक्तव्य

लोकसत्ता वार्ताहर

नांदेड : मराठवाडा विभागातील दुसरे महसूल आयुक्तालय आधीच्या शासन निर्णयानुसार नांदेडला स्थापन होण्याची आशा महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी येथे केलेल्या वक्तव्यातून पल्लवीत झाली आहे. या निर्णयामुळे नांदेड व लातूर जिल्ह्यात पूर्वी वाद झाले होते. बावनकुळे यांच्या निर्णयामुळे यास नवी फोडणी मिळण्याची शक्यता दिसून येत आहे.

भारतीय जनता पार्टीच्या विभागीय बैठकीनिमित्त बावनकुळे तसेच पक्षाचे कार्याध्यक्ष आमदार रवींद्र चव्हाण शुक्रवारी शहरामध्ये आले होते. पक्षाची बैठक पार पडल्यानंतर स्थानिक वार्ताहरांशी बोलताना बावनकुळे यांनी आता भाजपात असलेले काँग्रेसचे माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांना साक्षीला ठेवत आयुक्तालयाच्या स्थापनेस अनुकूलता दर्शविली.

अशोक चव्हाण मुख्यमंत्री असताना तत्कालीन मंत्रिमंडळाने मराठवाड्यातील दुसरे महसूल आयुक्तालय नांदेडला स्थापण्याचा निर्णय घेतला होता. पण पुढे नांदेड-लातूर जिल्ह्यांदरम्यानच्या वादात हा विषय न्यायप्रवीष्ट झाला. सहा वर्षांनंतर न्यायालयानेच आयुक्तालय स्थापण्याचा मार्ग मोकळा केला तरी, २०१५ साली त्याची प्रक्रिया सुरू झालेली असतानाच तत्कालीन मुख्यमंत्री फडणवीस यांनी हा विषय तेथेच थांबविला होता. त्यानंतरच्या १० वर्षांपासून आयुक्तालयाचा विषय शासन दरबारी प्रलंबित आहे. २०१९ ते २०२२ या कालखंडात अशोक चव्हाण आघाडी सरकारमध्ये मंत्री होते, तरी त्यांना आयुक्तालयाच्या विषयात हात घालता आला नव्हता. पण आयुक्तालयाच्या विषयाकडे महसूलमंत्री या नात्याने बावनकुळे यांचे लक्ष वेधण्यात आले असता त्यांनी या बाबतीत अनुकूलता दर्शवितानाच पत्रकारांनी या विषयी केलेल्या सूचनेचा शासन विचार करेल, असे स्पष्ट केले.

वाळू माफियांचे कंबरडे मोडणार

महाराष्ट्रातील बहुतांश जिल्ह्यात वाळू माफियांनी अक्षरशः हैदोस घातला आहे. शासन यंत्रणेला त्यांचे कंबरडे मोडावेच लागणार असल्याचे बावनकुळे यांनी निःसंदिग्धपणे सांगितले. येत्या दोन वर्षांत आम्ही असे वाळू धोरण आखणार आहोत, की ज्यामुळे कोणत्याही जिल्ह्यात माफियागिरी चालणार नाही, अशी माहिती त्यांनी यावेळी दिली. भाजपाच्या संघटनात्मक निवडणुकांची सर्व प्रक्रिया १५ मार्चपर्यंत पूर्ण केली जाणार असल्याचे त्यांनी सांगितले.

संमेलन गीत ‘आम्ही असू अभिजात’चे लोकार्पण

नागपुरात नितीन गडकरी यांच्या उपस्थितीत कार्यक्रम

छत्रपती संभाजीनगर : देशाची राजधानी दिल्ली येथे २१ ते २३ फेब्रुवारी दरम्यान होऊ घातलेल्या ९८ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे ‘आम्ही असू अभिजात’ गीताचे लोकार्पण केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते नुकतेच राज्याची उपराजधानी नागपूर येथे करण्यात आले. डॉ. अमोल देवळेकर यांनी लिहिलेल्या या संमेलन गीताला नांदेड येथील महिला संगीतकार आनंदी विकास यांनी संगीतबद्ध केले आहे. सुप्रसिद्ध गायक-संगीतकार शंकर महादेवन आणि हरिहरन यांच्यासह मंगेश बोरगावकर, सागर जाधव,

शमिमा अख्तार यांचे स्वर गीताला लाभले आहेत. संगीत संयोजन प्रथमेश कानडे यांचे, तर तांत्रिक बाजू मन्मथ मठपती, आदित्य देशमुख यांनी सांभाळल्या आहेत. गडकरी यांच्या नागपुरातील निवासस्थानी संमेलन गीताचे लोकार्पण एका छोटेखानी कार्यक्रमात पार पडले. या वेळी संगीतकार आनंदी विकास, विकास देशमुख, अनिल मुळजकर, आदित्य विकास, योगेश कदम यांची उपस्थिती होती.

गडकरी यांनी संमेलन गीताचे कौतुक केले. तसेच शंकर महादेवन व हरिहरन यांच्यासारख्या दिग्गज गायकांच्या स्वरांमुळे खऱ्या अर्थाने अभिजात निर्मिती झाली असल्याचे गौरवोद्गारही त्यांनी काढले, असे संगीतकार आनंदी विकास यांनी ‘लोकसत्ता’ ला सांगितले.

नाही.. नाही.. म्हणत दानवेंची चौफेर टोलेबाजी

काळे, गोरंट्याल आणि खोतकरांना कोपरखळ्या

लोकसत्ता वार्ताहर

जालना : खासदार कल्याण काळे, आमदार कैलास गोरंट्याल, अर्जुन खोतकर यांसह जिल्ह्यातील सर्व नेत्यांना नाही नाही म्हणत भाजपचे ज्येष्ठ नेते रावसाहेब दानवे यांनी टोले लगावले.

‘निवडून आलेल्या लोकप्रतिनिधींनी पूर्वीच्या योजनांपेक्षा त्यांनी नवीन काय आणले हे सांगावे,’ असे विद्यमान खासदार कल्याण काळे यांना टोला लगावला. त्यांच्याविषयी वर्षभर काहीच बोलणार नाही. मंजूर झालेल्या जालना-जळगाव या नवीन रेल्वे मार्गाचा विस्तार जालना-बीड-सोलापूर, असा करण्याची मागणी जालना जिल्हा रेल्वे संघर्ष समितीने केली आहे. त्याविषयी माजी रेल्वे राज्यमंत्री म्हणून तुम्ही शब्द टाकाल काय, यासंदर्भात विचारलेल्या प्रश्नावर दानवे म्हणाले, समितीने ही मागणी नव्याने निवडून आलेल्या खासदारांकडे केली पाहिजे.’ अशी कोपरखळी त्यांनी मारली.

जालना महापालिकेसाठी ९५ कोटी रुपयांचा सौर ऊर्जा प्रकल्प मंजूर झाला असल्याचा तपशील आमदार अर्जुन खोतकर यांनी दिला होता. त्यानंतर माजी आमदार कैलास गोरंट्याल यांनी याबाबतचे श्रेय स्वतःकडे घेणारी प्रतिक्रिया दिली होती. याबाबत दानवे म्हणाले, यासाठी आपले प्रयत्न कारणीभूत आहेत. परंतु दोघांनीही आपले नाव मात्र घेतले नाही. यासाठी आपण वेळोवेळी केलेल्या प्रयत्नांचा कागदोपत्री तपशीलही त्यांनी पत्रकारांसमोर मांडला.

दानवे म्हणाले, निवडून आलेल्या लोकप्रतिनिधींनी अगोदरच्या योजनांचे श्रेय घेण्याऐवजी नवीन कोणती कामे करावीत हे सांगण्यासाठी आपण येत्या मार्चच्या दुसऱ्या आठवड्यात परिषद घेणार आहोत. जिल्ह्याच्या विकासाचे ‘व्हीजन डॉक्यूमेंट’ तयार करण्यासाठी निवडून आलेल्या आणि पराभूत झालेल्या सर्वपक्षीय लोकप्रतिनिधींना आमंत्रित करणार आहोत. ज्येष्ठतेच्या नात्याने आपला हा अधिकार आहे, असे सांगायला ते विसरले नाहीत.

भोकरदन येथील शासकीय तंत्रनिकेतनच्या नामकरण कार्यक्रमास काँग्रेसचे खासदार डॉ. कल्याण काळे यांना आमंत्रित करण्यात आले नव्हते. त्यावर दानवे म्हणाले, संबंधित अधिकाऱ्यांस खासदाराचे नावच माहीत नसले तर याला आपण काय करणार ? जिल्ह्याचा विकास करण्याचे उद्दिष्ट ठेवून निवडून आलेल्या आमदार-खासदारांनी काम करावे, असे सांगून आमदार असलेल्या आपल्या मुलासही हीच सूचना असल्याचे दानवे म्हणाले.

दि मलकापुर अर्बन को-ऑप. बँक लि., मलकापूर

मुख्य कार्यालयः "धनश्री" मलकापूर, जि. बुलढाणा (अवसायनात)

मागणी सूचना

खाली उल्लेख केलेल्या कर्जदाराने वाळूज शाखेतून विनंतीनुसार मागणी सूचनेमध्ये नमूद केल्याप्रमाणे कर्ज घेतलेले आहे. त्यासाठी त्यांनी विविध प्रकारचे दस्तैवज देखील करून दिलेली आहेत. तसेच त्यांनी खालील नमुद केलेली मालमत्तां बँकेच्या हक्कात गहाण करून दिलेली आहेत. कर्जदार यांनी खालील दिल्याप्रमाणे मुद्दल आणि व्याजाचे हप्ते नियमीत फेडण्यास कसूर केल्यामुळे सदरील खाते खालील तारेखेस अनुत्पादक झाले आहे. **खालील कर्जदार /गहाणदार / जामीनदार यांना दि सेक्युरिटायजेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शीयल असेटस ॲण्ड एन्फोर्समेंट ऑफ सेक्युरिटी इंटरेस्टस ॲक्ट, २००२ (SARFAESI Act, २००२) च्या कलम १३(२)** नुसार मागणी नोटीस पाठवून ६० दिवसांच्या आत खाली निर्देशित रक्कम भरण्यास कायदेशीर नोटीस पाठविलेली आहे. परंतु सदरील नोटीस पोहच न होता व मागणी न होताच परत आल्या. करीता हि प्रसिद्धी.

अ. क्र.	कर्जदाराचे नांव	नोटीस दिनांक, मागणी रक्कम, NPA तारिख व शाखा	तारण मालमत्ता / संरक्षीत संपत्ती	कर्जाचा प्रकार
1)	**१) मे. सम्राट अग्रो पाईप्स** **प्रो.प्रा.श्री.वेसांतर प्रकाश थोरात** गट क्रं.. १६(भाग),खोजेवाडी, तालुका गंगापूर, ,छत्रपती संभाजी नगर (कर्जदार व गहाणदार) **२) श्री.किरण गणपतराव मंडाळे** प्लॉट क्रं. ९४८,सुधाकर नगर, पोलीस कॉलनी, छत्रपती संभाजीनगर (जामीनदार) **३)श्री संतोष रंगराव बोरे** एन -९, ए-११६, एम ५८/४ ,सिडको, छत्रपती संभाजीनगर (जामीनदार)	०५/१२/२०२४ **कॅश क्रेडीट /हायपो ,** **मुद्दल रक्कम रु.२९,३६,६२०.७२** न आकारलेले व्याज **रु.५,१०,३३३/-** (कालावधी ०१/०७/२०२३ ते ३०/११/२०२४) **एकूण रक्कम रु.३४,४६,९५३.७२** दिनांक ३०/११/२०२४ रोजी + त्यावर व्याज NPA तारीखः ३०/०३/२०२४ **शाखा -वाळूज, छत्रपती संभाजीनगर**	श्री वेसांतर प्रकाश थोरात यांच्या मालकीची सर्व भाग व पोटभाग हिस्सांसहित गट क्रं. १६ मधील एकूण क्षेत्रफळ २० आर असलेली (बांधकाम क्षेत्रफळ ६००० चौरस फुट कमर्शियल फॅक्टरी शेड) खोजेवाडी ,ता. गंगापूर,जि. छत्रपती संभाजीनगर येथील असून त्याची **चतु:सिमा** खालील प्रमाणे आहे. **पूर्वः** बहुजन हिताय मागासवर्गीय औद्योगिक संस्थेची उर्वरित जमीन, **पश्चिमः** सरकारी सीमा, **उत्तर :** रामराव आझाडे यांची जमीन, **दक्षिणः** संतोष बिंगारे यांची जमीन	**कॅश क्रेडिट / हायपो.**

कर्जदार/गहाणदार /जामीनदार यांना याद्वारे सुचित करण्यात येते की, प्राधिकृत अधिकारी सरफेसी कायद्याच्या तरतुदीनुसार तारण मालमत्ता / संरक्षीत संपत्तीचा ताबा घेवून सदरील मालमत्ता लिलावाद्वारे विक्रीस काढतील तसेच जर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ६० दिवसांचे आत उपरोक्त थकबाकी बँकेच्या समाधानापर्यंत **न फेडल्यास** आपणाकडे कोणताही आधार राहणार नाही व बँकेस असलेल्या इतर कायदेशिर अधिकारांचा वापर करून कोणतीही सूचना न देता पुढील कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल.

संरक्षीत मालमत्तेच्या मुक्ततेसाठी असलेल्या उपरोक्त कायद्यामधील कलम १३ चे उपकलम (८) मधील तरतुदीमधे उपलब्ध असलेल्या वेळेसाठी कर्जदार यांचे लक्ष वेधण्यात येत आहे.

सही/-
प्राधिकृत अधिकारी
दि मलकापूर अर्बन को-ऑप बँक लि., मलकापूर
(अवसायनात)

दिनांक : १५/०२/२०२५
ठिकाणः छत्रपती संभाजीनगर

(टिप : स्वैर भाषातर, तफावत पडल्यास मुळ इंग्रजी ग्राह्य)

हिंगोलीमध्ये ६५५ कोटींच्या निधीची गरज

हिंगोली : जिल्ह्यातील विविध विकासकामांची ६५५ कोटी रुपयांच्या निधीची गरज असून, २७० कोटी रुपयांची कंत्राटदारांची देणी थकली आहेत. परिणामी नवे काम घेण्यासाठी प्रसिद्ध होणाऱ्या निविदांकडे कंत्राटदार पाठ फिरवत असल्याचे दिसून येत आहे.

भांडवली खर्चात कपात करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतल्याने येत्या काळात निधी मिळेल का, अशी भीती कंत्राटदारांना वाटू लागली आहे. विकासकामांसाठी गेल्या सहा महिन्यांपासून निधी मिळालेला नाही. जिल्हा वार्षिक योजनचा ११२ कोटी रुपयांचा निधी थकला आहे.

जुन्या अभ्यासक्रमाची प्रश्नपत्रिका दिल्याने विद्यार्थ्यांचे भवितव्य टांगणीला

लोकसत्ता वार्ताहर

लातूर : शहरातील एम. एस. बिडवे अभियांत्रिकी महाविद्यालयात परीक्षा व्यवस्थेतील गोंधळामुळे ७९ विद्यार्थ्यांचे भवितव्य टांगणीला लागले आहे. हा प्रश्न अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेने उचलला. प्राचार्यांना धारेवर धरत विद्यार्थ्यांना न्याय देण्याची मागणी संघटनेने केली आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे संलग्नित महाविद्यालयाच्या तृतीय वर्षाच्या संगणक शास्त्र शाखेच्या विद्यार्थ्यांचा सॉफ्टवेअर इंजिनिअरिंग विषयाचा पेपर १२ फेब्रुवारीला होता. नवीनऐवजी जुन्या अभ्यासक्रमाचीच प्रश्नपत्रिका विद्यार्थ्यांना देण्यात आली.

हा प्रकार परीक्षा संपल्यानंतर उघडकीस आला. अभाविपचे प्रदेश सहमंत्री सुशांत एकुर्गे यांनी याप्रकरणी सांगितले, की महाविद्यालय आणि विद्यापीठ प्रशासनाच्या तांत्रिक चुकीमुळे ७९ विद्यार्थ्यांचे भवितव्य टांगणीला लागले आहे. यासंबंधी विद्यापीठाने तोडगा काढावा अन्यथा विद्यार्थ्यांच्या रोषाला सामोरे जावे लागेल, असा इशारा देण्यात आला.

तोडगा काढण्याचा प्रयत्न

परीक्षेच्या प्रश्नपत्रिका छापील येत नाहीत. महाविद्यालयाकडे सांकेतिक भाषेत प्रश्नपत्रिका पाठवली जाते. ती ‘डाऊनलोड’ करून त्याच्या छायांकित प्रती काढल्या जातात. मग त्या वितरित केल्या जातात. हे वितरण संपल्यानंतर विद्यापीठाच्या वतीने सांकेतिक भाषेत संदेश पाठवण्यात आला. पहिल्या प्रश्नपत्रिकेऐवजी ही प्रश्नपत्रिका वापरा, असे त्यात म्हटले होते. मात्र, प्रश्नपत्रिका वितरण करताना संबंधितांनी जुन्या अभ्यासक्रमाची प्रश्नपत्रिका वितरित केली. त्यामुळे हा प्रश्न निर्माण झाला आहे. विद्यापीठाकडे पाठपुरावा करून त्यातून कसा तोडगा काढायचा, हे ठरवू.

– प्राचार्य वीरभद्र बाले, एम. एस. अभियांत्रिकी महाविद्यालय

वैद्यकीय अधिकारी गट ‘ब’ व्यवसायरोध भत्त्यापासून वंचित

‘मॅट’मध्ये धाव, राज्य शासनाला नोटीस

लोकसत्ता प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर : वैद्यकीय अधिकारी गट ‘अ’ व गट ‘ब’ यांना पाचव्या व सातव्या आयोगाप्रमाणे व्यवसायरोध (नॉन प्रॅक्टिसिंग अलाउन्स) भत्ता मंजूर करण्यात आला होता. परंतु नुकताच राज्य शासनाने १४ ऑक्टोबर २०२४ रोजीच्या शासन निर्णयाप्रमाणे हा भत्ता फक्त गट ‘अ’ वैद्यकीय अधिकाऱ्यांना मंजूर करण्यात आला आहे. यातून गट ‘ब’ यांना शासन निर्णयामधून वगळण्यात आले असून, याप्रकरणी चाळीसगावचे डॉ. प्रमोद सोनवणे यांनी शासनाविरोधात महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणात धाव घेतली. न्यायाधिकरणाने राज्य शासनाला कारणे दाखवा नोटीस बजावली आहे.

वैद्यकीय अधिकारी गट ब यांना व्यवसायरोध भत्त्यापासून शासन निर्णयामध्ये वगळणे ही बाब ही भारतीय राज्यघटनेच्या कलम १४ च्या तरतुदींच्या विसंगत आहे. त्यामुळे भत्ता लागू करण्याबाबत विनंती केली होती. परंतु, शासनाने कोणत्याही प्रकारची दखल न घेता एकतर्फी, कोणतेही सबळ कारण नसताना वैद्यकीय अधिकारी गट ब यांना व्यवसायरोध भत्ता मंजूर केला नाही.

सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे पाचवा वेतन आयोग व सहावा वेतन आयोग यामध्ये सदर भत्ता सर्वच वैद्यकीय अधिकारी यांना लागू करण्यात आला होता आणि सर्वच वैद्यकीय अधिकाऱ्यांना हा भत्ता मिळतही होता. परंतु नुकत्याच पारित करण्यात आलेल्या शासन निर्णयानुसार (१४ डिसें. २०२४) गट अ व गट ब असा भेद करण्यात आला असून, गट ब यांना भत्ता देय करण्यात आलेला नाही.

अचानक भत्ता जो सहाव्या वेतन आयोगाप्रमाणे मिळत होता तोदेखील बंद झाल्यामुळे महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण यांनी महाराष्ट्र शासनाला कारणे दाखवा नोटीस काढलेली आहे. याचिकाकर्त्यांकडून डॉ. प्रमोद सोनवणे यांच्यामार्फत ॲड. विनोद पाटील काम पाहत आहेत, त्यांना ॲड. राहुल सावळे, ॲड. मुकुल देशमुख, ॲड. राज कऱ्हाडे सहकार्य करीत आहेत.

लोकसत्ता Classifieds
FROM ANYTHING TO EVERYTHING.

जागाविषयक

ALIBAUG Available for sale Agriculture Land & NA Plot starting from 5 Gunta @ Nagaon, Chaul, Korlia, VIESTAR: 9359332231/ 9823254600.
0070951209-1

भविष्यविषयक

ॲस्ट्रॉलॉजी : गोल्ड मेडलिस्ट, जन्मकुंडली बनविणे, जुळविणे, जन्मकुंडलीवरून तसेच हस्तरेषा- चेहरा, फोटोवरून आपल्या प्रश्नांवर सविस्तर भविष्य तसेच/ वास्तुशास्त्राचे महत्त्व. वास्तुशांतीचे साधे-सोपे उपाय ५० पानांवर लिहून मिळतील. पाहिजे असल्यास हिंदी/ इंग्रजीमधून लिखाण मिळेल. (प्रश्नांची फी एकदाच सुरुवातीला स्वीकारतो.) नवग्रहांचे रत्ने, भाग्योदय यंत्रे, रुद्राक्ष इतर शुभवस्तू सुचवितो व अनुष्ठान करून दिले जातील. मुख्य कार्यालय श्री. सुधाकर सदानंद जोशी, कु. यशश्री सुधाकर जोशी. सोमवार ते शनिवार सकाळी १० ते संध्याकाळी ६. योगी निवास बंगला, पहिला मजला, किसन क्रॉस रोड, नवीन पोलीस क्वार्टर्सजवळ, मालाड (परिचम), मुंबई-४०००६४. 9820553276/ 9820612578. (वरील पत्त्याशिवाय आमची कुठेही शाखा अथवा प्रतिनिधी नाहीत.)
0070950385-1

यात्रासहल

दोस्तीटूर * अंदमान * नेपाळ- मुक्तिनाथ- जनकपूर * भुतान * कुरवपूर- पिठापुरम * नर्मदापरिक्रमा * शिमला- मनाली * उत्तरवाहिनीपरिक्रमा * सिक्कीम दार्जिलिंग * चारधामयात्रा * आसाम- पूर्वांचल- मेघालय. 8828224121/ 9702251584.
0070915287-13

श्रीरामकृष्ण- चारधाम- त्रियुगी नारायण- ०१.०५.२०२५// १२.०५.२०२५// २३.०५.२०२५// काश्मीर- वैष्णोदेवी- टुलिप गार्डन- ०२.०४.२०२५// १९.०४.२०२५// सिक्कीम- दार्जिलिंग- भूतान- १५.०४.२०२५// ०९.०५.२०२५ उत्तरवाहिनी नर्मदा परिक्रमा- ०१.०४.२०२५// १७.०४.२०२५ लेह लडाख- २५.०४.२०२५// १५.०५.२०२५// आयोध्या- नेपाळ- जनकपूर- १८.०३.२०२५// १८.०४.२०२५// १६.०५.२०२५// नैनिताल- जिम कॉर्बेट पार्क- मुनसियारी- २४.०४.२०२५// कोकणातील आनंदवन. बापट- 9137001395/ 9820023106.
0070945299-3

***प्रवासी टूर्स (मुंबई)* स्वस्त/मस्त किचन युनिटसह... *दार्जिलिंग- सिक्कीम गंगटोक- नामची- आसाम- चेरापुंजी- हावडा- कलकत्तासह... १२ मे (१३ दिवस.) २३५००/- *चारधाम- गंगोत्री- यमुनोत्री- उत्तरकाशी- केदारनाथ- बद्रीनाथ- हरिद्वार- ऋषीकेशसह... २७ जून (१३ दिवस.) २३५००/- *9322022096/ 9082588511.**
0070949012-1

मॅरेज ब्युरो

सुप्रसिद्ध सौ. कुलकर्णी विवाहसंस्थेत नाव नोंदवा. सर्व जातींची उच्चशिक्षित स्थळे उपलब्ध. ४२ वर्षांची विश्वसनीय परंपरा. लाखो विवाह जुळविण्याचा अनुभव. 8369692734/ 9892625606.
0070934850-9

महत्त्वपूर्ण निवेदन

वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातींचा मजकूर (ॲडव्हर्टाइजिंग कॉपी) स्वीकारण्यापूर्वी काळजी घेतली जात असली तरी त्याच्या आशयाची (कन्टेन्ट) पडताळणी करणे शक्य होत नाही. तरी, आपल्या वृत्तपत्रांमध्ये अथवा प्रकाशनांमध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातींतील जाहिरातदार कंपन्या, सहयोगी संस्था अथवा व्यक्तींबरोबर व्यवहार केल्यामुळे कोणत्याही स्वरूपाचे नुकसान वा हानी झाल्यास त्यासाठी अथवा संबंधित जाहिरातीतील आशयासाठी द इंडियन एक्स्प्रेस (प्रा.) लिमिटेडला जबाबदार ठरविता येणार नाही. त्यामुळे वाचकांना आम्ही असा सल्ला देतो की, जाहिरातदारांना कोणतीही रक्कम प्रेषित करण्यापूर्वी अथवा त्यांच्याबरोबर कोणत्याही स्वरूपाचे संमतिपत्र कार्यसिद्ध करण्यापूर्वी अथवा एखाद्या जाहिरातीवर आधारित कोणतीही कृती करण्यापूर्वी त्यांनी आवश्यक ती चौकशी करण्याची खबरदारी घ्यावी.

Can Fin Homes Ltd
(Sponsor: CANARA BANK)
HOME LOANS • DEPOSITS
Translating Dreams into Reality

शाखा : कार्यालय क्र. १०१, पहिला मजला, आनंद बिझनेस सेंटर, सी.टी.एस.क्र. १७३००३, संत एकनाथ रंगमंदिर, न्यू उस्मानपुरा, औरंगाबाद-४३१००५
नोंद. कार्या. क्र. २९/१, सर एम. एन. कृष्णा राव रोड, बसवनगुडी, बंगलोर-५६० ००४.
ई-मेल : aurangabad@canfinhomes.com
दूर. : ९१७२७८६२६३, www.canfinhomes.com
सीआयएन क्र.: एल८५११०केए१९८७पीएलसी००८६९९

ताबा सूचना

[नियम ८(१)] [स्थावर मालमत्तेसाठी]

निम्नस्वाक्षरीकार हे सिक्युरिटायजेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स ॲण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ अंतर्गत कॅन फिन होम्स लि.चे प्राधिकृत अधिकारी असून नमूद कायदा आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) नियमावली, २००२ अंतर्गत देण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून कर्जदार **श्री. नारायण रावसाहेब पुरी आणि श्रीमती मंगल नारायण पुरी** यांना सूचनेमध्ये नमूद करण्यात आलेल्या रक्कम **रु. १६,३४,७९७/- (रुपये सोळा लक्ष चौतीस हजार सातशे सत्त्याण्णव मात्र)** अधिक त्यावरील वसुली होईपर्यंत करारानुसार दराने व्याजाचा भरणा नमूद सूचना दिनांकापासून ६० दिवसांच्या आत भरणा करण्यासाठी मागणी सूचना दिनांकित **११.१२.२०२४** जारी करण्यात आली होती.

कर्जदार रकमेचा भरणा करू न शकल्यामुळे सूचना याद्वारे कर्जदार आणि सामान्य जनतेला याद्वारे देण्यात येत आहे की, निम्नस्वाक्षरीकारांनी येथे खाली वर्णन करण्यात आलेल्या (सिक्युरिटी इंटरेस्ट एन्फोर्समेंट नियमावली, २००२) च्या नियम ८ सह वाचल्या जाणाऱ्या नमूद कायद्याच्या कलम १३(४) अंतर्गत देण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून १३ फेब्रुवारी २०२५ रोजी ताबा घेतला आहे.

सुरक्षित मालमत्ता सोडविण्यासाठी उपलब्ध असलेल्या वेळेसंदर्भात कायद्याच्या कलम १३ च्या पोटकलम (८) मध्ये असलेल्या तरतुदीकडे कर्जदाराचे लक्ष वेधून घेण्यात येत आहे.

विशेषत: कर्जदार आणि सामान्य जनतेला याद्वारे सावध करण्यात येत आहे की, मालमत्तेशी कोणताही व्यवहार करू नये आणि मालमत्तेशी असा व्यवहार सीएफएचएलकडे **रु. १६,३४,७९७/- (रुपये सोळा लक्ष चौतीस हजार सातशे सत्त्याण्णव मात्र)** आणि त्यावरील व्याजाचा भरणा करण्यासाठी बाध्य असतील.

स्थावर मालमत्तेचे वर्णन

शेंद्राजहांगीर, ता. आणि जिल्हा औरंगाबाद येथे वसलेल्या प्लॉट क्र. ८ ते १३, गट क्र. १९७ वर बांधण्यात आलेल्या ६५.८८ चौ.मी. चटईक्षेत्र आणि ६७.०५२ चौ. मीटर बिल्टअप मोजमाप असलेल्या ‘‘अजिंक्य पार्क’’मधील रो हाऊस क्र. ४चा सर्व खंड आणि भूखंड. सीमा पुढीलप्रमाणे :

पूर्व : रो हाऊस क्र. ०५ पश्चिम: रो हाऊस क्र. ०३
दक्षिण : प्लॉट क्र. ०२ उत्तर: ९ मीटर रुंद रोड

सही/-
प्राधिकृत अधिकारी
कॅन फिन होम्स लि.

ठिकाण : औरंगाबाद
दिनांक : १३.०२.२०२५

kotak **कोटक महिन्द्रा बँक लिमिटेड** मत्तेची ऑनलाइन ई-लिलाव विक्री

नोंदणीकृत कार्यालय : २७ बीकेसी, सी२७, जी-ब्लॉक, बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रे (पू), मुंबई-४०० ०५१.
शाखा कार्यालय : कोटक महिन्द्रा बँक लिमिटेड, एबीसी-ईस्ट कॉम्प्लेक्स, पहिला मजला, प्रोझोन मॉलसमोर, चिकलठाणा एमआयडीसी, छत्रपती संभाजीनगर, औरंगाबाद-४३१ ००६.

स्थावर मालमत्तेच्या विक्रीकरिता विक्री सूचना

सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेन्ट) रुल, २००२च्या रुल ८(५) व ८(६) अंतर्गत सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स ॲण्ड एन्फोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ अंतर्गत स्थावर मालमत्तेच्या विक्रीकरिता ई-लिलाव विक्री सूचना. ‘‘फुल्लर्टन इंडिया होम फायनान्स कंपनी लिमिटेड’’द्वारा (यापुढे ‘‘**एफआयएचएफसीएल**’’ म्हणून संदर्भित) ‘‘कोटक महिन्द्रा बँक लिमिटेड’’च्या नावे ऋणांच्या अभिहस्तांकनानंतर, ‘‘कोटक महिन्द्रा बँक लिमिटेड’’च्या (यापुढे बँक/ केएमबीएल/ सुरक्षित धनको म्हणून संदर्भित) प्राधिकृत अधिकारींनी **२२.०१.२०२५** रोजी सुरक्षित धनकोंकडे गहाण असलेल्या/ ताब्यात असलेल्या याखाली वर्णिलेल्या स्थावर मालमत्तेचा (यापुढे सुरक्षित मत्ता म्हणून संदर्भित) ताबा घेतला आहे. याद्वारा विशेषकरून ऋणको व सह-ऋणको तसेच आम जनतेस सूचना देण्यात आली आहे की, बँकेने याखालील सविस्तर तपशिलानुसार **श्री. राजू नाना काळे, श्रीमती सुनिता ज्ञानेश्वर पाटील व मेसर्स शिवाज्ञा मेना वेअर** यांच्याद्वारा लाभ घेतलेले कर्ज; **लोन अका. नं.** 604907210455097 अंतर्गत, वसुलीपर्यंत पुढील लागू व्याजासह **११.०२.२०२५** रोजीप्रमाणे थकीत रक्कम **रु. २०,०८,६३२/- (रुपये वीस लाख आठ हजार सहाशे बत्तीस फक्त)** या रकमेच्या वसुलीकरिता ‘‘जसे आहे जेथे आहे’’, ‘‘जसे आहे जे काही आहे’’ आणि ‘‘जे काही आहे तेथे आहे’’ या तत्त्वावर सरफेसी ॲक्ट, २००२च्या तरतुदीअंतर्गत ई-लिलावाद्वारे सुरक्षित मत्तेची विक्री करण्याचे ठरविले आहे.

तपशील	सविस्तर माहिती
लिलावाची तारीख	२०.०३.२०२५
लिलावाची वेळ	दु. १२.०० व दु. ०१.०० दरम्यान ५ मिनिटांच्या अमर्यादित विस्तारासह
राखीव किंमत	रु. १२,००,०००/- (रुपये बारा लाख फक्त)
इसारा रक्कम ठेव (इरठे)	रु. १,२०,०००/-(रुपये एक लाख वीस हजार फक्त)
केवायसीसमवेत इरठेच्या सादरीकरणाकरिता शेवटची तारीख	१९.०३.२०२५ रोजी सायं ०६:०० वा (भाप्रवे) पर्यंत
सुरक्षित मत्तेचे वर्णन	पुढील मालमत्तेचे सर्व खंड व तुकडे- ब्लॉक नं. १, बिल्ट-अप एरिया मोजमापाचा ३१.०२५ चौ.मी., प्लॉट नं. १६ मधील पार्ट पोर्शन मोजमापाचा ४५.०० चौ.मी. यावर बांधकाम करावयाचे किंवा बांधकाम केलेले, मोजमापाचा ९०.०० चौ.मी., सर्व्हे नं. ३०/१/२८/४ मधील रेखांकित प्लॉट्सपैकी व येथे स्थित- जळगाव शिवार, ता. व जि. जळगाव, जळगाव सिटी म्युनिसिपल कॉर्पोरेशनच्या मर्यादेत व उप-नोंदणी कार्यालय जळगावच्या मर्यादेत, जळगाव-४२५ ००१. मालमत्ता पुढीलप्रमाणे सीमित: पूर्व: ९ मी. रोड, पश्चिम: प्लॉट नं. ०१, उत्तर: सदर प्लॉटचा ब्लॉक नं. २, दक्षिण: प्लॉट नं. १५.
ज्ञात भार	काही नाही

सुरक्षित मत्तेच्या उपलब्ध वेळेत विमोचनाकरिता ॲक्टच्या सेक्शन १३च्या सब-सेक्शन ८च्या तरतुदींकडे ऋणकोंचे लक्ष वेधीत आहोत. विशेषकरून ऋणको व आम जनतेने कृपया नोंद घ्यावी की, जे काही असेल त्या कारणास्तव निर्धारित लिलाव अयशस्वी ठरल्यास, सुरक्षित धनको खासगीरीत्या विक्रीद्वारा सुरक्षित हिताची अंमलबजावणी करतील. **विक्रीअंतर्गत मालमत्तेबाबत कोणतेही स्पष्टीकरण/ आवश्यक माहिती याकरिता बोलीदार संपर्क साधू शकतील- स्पष्टीकरणाकरिता बँकेचा आयव्हीआर नं. (+९१५२२१९७५१). बोलीदार स्पष्टीकरणाकरिता यांच्याशीसुद्धा संपर्क साधू शकतील : श्री. ज्ञानेश जडे (मोबा. नं. +९१९४२०१०१२८०), श्री. अमोल कुरणगल (मोबा. नं. +९१९६०४२१२०६४) व श्री. ॲग्नेल पिल्लय (मोबा. नं. +९१८९७६९२९६८५).** विक्रीच्या सविस्तर शर्ती व अटींकरिता कृपया, बँकेच्या वेबसाइटवर म्हणजेच www.kotak.com आणि/ किंवा http://bankauctions.in/ यावर तरतूद केलेल्या https://www.kotak.com/en/bank-auctions.html या लिंकला भेट द्यावी.

कोटक महिन्द्रा बँक लि.करिता
प्राधिकृत अधिकारी

स्थळ : जळगाव, महाराष्ट्र, दिनांक : १५.०२.२०२५

KHUSH HOUSING FINANCE

खुश हाऊसिंग फायनान्स प्रायव्हेट लिमिटेड
नोंदणीकृत कार्यालय : ८१०, ऑरा बायप्लेक्स, एसव्ही रोड, बोरिवली (पश्चिम), मुंबई-४०००९२.
औरंगाबाद शाखा : खुश हाऊसिंग फायनान्स प्रा. लि., २०३, सम्यक गॅलेरिया, सूतगिरणी चौक, गारखेडा, औरंगाबाद-४३१००५.

ताबा सूचना (स्थावर मालमत्तेसाठी)

ज्याअर्थी निम्नस्वाक्षरीकार हे खुश हाऊसिंग फायनान्स प्रायव्हेट लिमिटेड यांचा अधिकृत अधिकारी आहे, यांनी सिक्युरिटायजेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल ॲसेट्स ॲण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ अंतर्गत आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) नियम २००२ च्या नियम ३ सहवाचता कलम १३(१२) अंतर्गत दिलेल्या अधिकारांचा वापर करून, कलम १३(२) अंतर्गत प्रत्येक खात्यासमोर नमूद केलेल्या तारखेला मागणी नोटीस जारी केली, ज्यामध्ये संबंधित कर्जदाराला सूचनेच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत प्रत्येक खात्याविरुद्ध नमूद केलेली रक्कम परत करण्याचे आवाहन केले.

कर्जदाराने रक्कम परत करण्यात अयशस्वी झाल्यास, कर्जदाराला आणि सर्वसामान्य जनतेला सूचना देण्यात येते की, दि. १०.०२.२०२५ रोजी, सदर कायद्याच्या कलम १३(४) आणि सदर नियम ८(१) अंतर्गत दिलेल्या अधिकारांचा वापर करून, खाली वर्णन केलेल्या मालमत्तेचा ताबा निम्नस्वाक्षरीकार यांनी घेतला आहे.

अ. क्र.	शाखा आणि एलएएन	कर्जदार/सह-कर्जदार आणि जामीनदार	मागणी सूचनेची तारीख आणि मागणी केलेली रक्कम	ताबा तारीख/स्थिती	मालमत्तेचा पत्ता
१	औरंगाबाद/ एलएनएयूआर००५१९-२००००३५६५	राहुल आत्माराम कदम (कर्जदार)/ योगिता राहुल कदम (सहकर्जदार)/ आत्माराम सर्जेराव कदम (सह-कर्जदार)	दि. ०७.११.२०२४/ रु. ३८९६४९/-	१०.०२.२०२५/ प्रतिकात्मक ताबा	फ्लॅट क्र. ४, दुसरा मजला एस.के. टॉवर प्लॉट क्र. १, सर्वेक्षण क्र. ८२/बी, मौजे जीओराज, जिल्हा बीड औरंगाबाद - ४३११२२.
२	औरंगाबाद/ एलएक्सएयूआर००११७-१८०००१६०३	छाया बबन गुजर (कर्जदार)/ अंजनाबाई बबन गुजर (सह-कर्जदार)	दि. ०४.११.२०२४/ रु. १०८४२७४/-	१०.०२.२०२५/ प्रतिकात्मक ताबा	प्लॉट क्र. २२, गट क्र. ७६८/१, मोजमापे क्षेत्रफळ १०३.३१ चौ.मी., रजिस्ट्रार ऑफिसच्यासमोर, गाव-शेवगाव, ता-शेवगाव, जिल्हा-अहमदनगर, ४१४५०२ त्यावर उभे असलेल्या बांधकामासह एकत्रित याचे ते सर्व तुकडे आणि पार्सल.

कर्जदारांना आणि सर्वसामान्य जनतेला याद्वारे इशारा देण्यात येतो की, त्यांनी सदर मालमत्तेचा पूर्णपणे किंवा अंशतः व्यवहार करू नये आणि सदर मालमत्तेशी संबंधित कोणताही व्यवहार हा खुश हाऊसिंग फायनान्स प्रायव्हेट लिमिटेड यांच्या शुल्काच्या विषयाधीन असेल, जो त्या तारखेला देय आणि थकित आहे. सुरक्षित मालमत्तेची पूर्तता करण्यासाठी उपलब्ध वेळेच्या संदर्भात कायद्याच्या कलम १३ च्या उप-कलम (८) च्या तरतुदींकडे कर्जदाराचे लक्ष वेधण्यात येत आहे.

सदर ही ताबा सूचना कर्जदाराच्या शेवटच्या ज्ञात पत्त्याच्या बाहेरील दारावर आणि गहाण ठेवलेल्या मालमत्ता यावरदेखील चिकटवली आहे.

सही/-
अधिकृत अधिकारी,
(मेसर्स खुश हाऊसिंग फायनान्स प्रा.लि.)

ठिकाण - औरंगाबाद
दिनांक - १५.०२.२०२५